


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५८, रविवार ३० जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# डीजेचा दणदणाट, फटाक्यांची आतिषबाजी आणि गगनभेदी घोषणा !

■ खासदार नीलेश लंके यांचे सुप्यात अभुतपूर्व स्वागत ■ लोकसभा निवडणूकीचा सुपा केंद्रबिंदू
■ अतिक्रमणे जमीनदोस्त केल्याचीही जल्लोषातील स्वागताला किनार

सुपा : विशेष प्रतिनिधी

**तत्कालीन आमदार नीलेश लंके यांना ज्या सुप्यामधून वारंवार टार्गेट केले गेले, त्यांनी मंजुर केलेल्या कामांना वारंवार स्थगिती देण्यास भाग पाडले, त्याच सुप्यामध्ये खासदार नीलेश लंके यांचे सुप्याच्या ग्रामस्थांनी डीजेचा दणदणाट, फटाक्यांची आतिषबाजी आणि गगनभेदी घोषणा देत अभुतपूर्व स्वागत केले. निवडणूकीच्या मतदानानंतर सुप्यातील अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. या जल्लोषाला अतिक्रमणे काढण्यात आलेल्या बाधितांच्या रोषाचीही किनार होती.**

लोकसभा निवडणूकीचा निकाल दि. ४ जुन रोजी जाहिर झाल्यानंतर सुप्यामध्ये लंके यांचा विजयोत्सव साजरा करण्यात आला होता. या विजयोत्सवामध्ये खा. लंके हे सहभागी होऊ शकले नव्हते. सहा तालुक्यांतील चाहत्यांना वेळ द्यावा लागत असल्याने लंके हे गेल्या ४ जुनपासून सतत व्यस्त होते. त्यांनी संसदेत शपथ घेतल्यानंतरही सुप्यात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येउन आनंद व्यक्त करण्यात आला.

अखेर दि. २८ जुन रोजी लंके हे दिल्लीहून शपथ घेऊन परतल्यानंतर सुप्यातील त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती. शुक्रवारी सायंकाळी आठ वाजल्याच्या सुमारास लंके यांचे सुप्याच्या बस स्थानक चौकात आगमन झाले आणि उपस्थित हजारो तरूणांच्या उत्साहाला उधाण आले. अनेक तरूणांच्या हातामध्ये लंके यांच्या जयजयकाराच्या घोषणा असलेले फलक होते. लंके हे वाहनातून उतरताच त्यांना खांद्यावर उचलून घेण्यात आले व तरूणांनी एकच जल्लोष केला. डिजेच्या तालावर तरूण थिरकू लागले. मोठया संख्येने फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येत असल्याने आसमंत उजाळून निघाला होता.

मा. सभापती दिपक पवार, मा. सरपंच राजूशेठ शेख, सचिन पठारे, मा. सरपंच विजय पवार, सचिन पवार, मा. उपसरपंच हनिफ शेख, भाऊ निवडूंगे, किरण पवार, दिपक पवार, बाळासाहेब औचिते, सचिन काळे, प्रसाद पवार, अमोल पवार, अक्षय थोरात, उपसरपंच विजय पवार, विलास पवार, सचिन वाढवणे, शहारूख शेख, मा. उपसरपंच लहानू पवार, अमोल पवार यांच्यासह हजारो कार्यकर्ते लंके यांच्या मिरणूकीत सहभागी झाले होते.



■ शपथविधीवरून परतल्यानंतर खासदार नीलेश लंके यांचे सुप्यात अभुतपूर्व स्वागत करण्यात आले.

## एक तास मिरवणूक

लंके हे बसस्थानक चौकात आल्यानंतर त्यांची पारनेर रस्त्याने सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. बसस्थानक चौक ते बाजारतळ हे अंतर कापण्यासाठी मिरवणूकीला तब्बल एक तासांचा वेळ लागला. मिरवणूकीदरम्यान अनेक नागरीकांनी त्यांची भेट घेत त्यांनी मिळविलेल्या या ऐतिहासिक विजयाबद्दल त्यांची अभिनंदन केले. अनेकांनी त्यांचा सत्कारही केला.

## खा. लंके भावूक

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर मतदानानंतर सुप्यातील शेकडो अतिक्रमणे महसूल व बांधकाम विभागाकडून जमीनदोस्त करण्यात आली. या अतिक्रमणधारकांनीही लंके यांची भेट घेत त्यांचा सत्कार केला. सत्काराप्रसंगी अतिक्रमणधारकांच्या डोळयात आश्रू उभे राहिले. त्यावेळी खासदार लंके हे देखील भावूक झाले होते. तुमच्या रोजी रोटीचा प्रश्न राजकारणापायी निर्माण झाला असला तरी आता मी तुमच्या पाठीशी आहे तुमचा प्रश्न मी मार्गी लावील अशी ग्वाही लंके यांनी यावेळी दिली.

## लोकसभेच्या निवडणूकीचा सुपा केंद्र बिंदू

सन २०१९ च्या निवडणूकीत साठ हजारांच्या मताधिक्क्याने विजय संपादन केल्यानंतर महाविकास आघाडीच्या काळात नीलेश लंके यांनी कोटयावधींची विकास कामे मार्गी लावली. राज्यात सरकार असल्याने लंके यांचा वारू सुसाट सुटला होता. मात्र महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुतीचे सरकार आल्यानंतर लंके यांना त्यांच्या विरोधकांकडून त्रास सुरू झाला. लंके समर्थकांची आर्थिक कोंडी करणे, लंके यांनी मंजुर केलेल्या कामांना स्थगिती देणे, अधिका-यांवर दबाव आणून लंके यांच्या कामांमध्ये अडथळे आणणे, लंके यांनी मंजुर केलेल्या कामांची भूमीपुजने, उद्घाटने करणे आदी प्रकारांमुळे लंके हे हैराण झाले होते. लंके यांच्या कामांमध्ये आडकाठी आणली जाताना सुपा हेच केंद्रस्थानी होते. त्यामुळे सुपा येथे लंके समर्थकांनी लंके यांचे खासदार म्हणून मोठया जल्लोषात स्वागत करीत विरोधकांना आपली ताकद दाखवून दिली.

## सुप्यातून सुरू झालेला संघर्ष संसदेपर्यंत पोहचला

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर नीलेश लंके यांची चोहोबाजूंनी कोंडी सुरू झाली. अजित पवार हे महायुतीध्ये सहभागी झाल्यानंतर नीलेश लंके यांनीही त्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. तरीही लंके यांच्या मागील ससेमिरा कमी झाला नाही. उलट लोकसभेचे संभाव्य उमेदवार म्हणून त्यांचा जाच अधिकच सुरू झाला. त्यामुळे लंके यांनी कोणत्याही परिस्थतीत लोकसभा लढवायचीच असा निर्धार करून ते शरद पवार यांच्या गटात सामील झाले. आणि विजयी देखील झाले. सुप्यातून लंके यांचा सुरू झालेला संघर्ष त्यांना संसदेपर्यंत घेऊन गेला. आपल्याला झालेल्या त्रासामुळेच आपण लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याचे लंके यांनी यापूर्वी एका मुलाखतीदरम्यान स्पष्ट केले होते.

## सुपेकरांचे लंके यांनाच मताधिक्य

लोकसभा निवडणूकीचा केंद्र बिंदू ठरलेल्या सुप्यातील मतदारांनी खासदार नीलेश लंके यांनाच मताधिक्य दिले. सुप्यात आघाडी घेण्यासाठी लंके व विखे समर्थकांमध्ये चढाओढ सुरू होती. मात्र मतदारांनी लंके यांनाच पसंती दिल्याचे मतमोजणीनंतर स्पष्ट झाले.

## घोडयावरून मिरवणूक

खा. नीलेश लंके यांना खांद्यावर घेऊन नाचण्यासाठी तरूणांमध्ये जणू स्पर्धा लागली होती. लंके यांच्या मिरवणूकीसाठी खास घोडा आणण्यात आला होता. तरूणांना थांबवून लंके यांना घोडयावर बसविण्यात आले. मिरवणूकीदरम्यान पावसाला सुरूवात झाल्यानंतर तरूणांच्या उत्साहाला अधिकच उधाण आले होते.

## धार्मिक भावनांचाही विषय

अतिक्रमणे काढताना मंदिर तसेच दर्गाही हटविण्यात आल्याने धार्मिक भावनांनाही ठेच पोहचली होती. त्याचा रोषही नागरीकांमध्ये होता. अतिक्रमणे हटविण्यात येत असताना नागरीकांना नीलेश लंके यांच्याशी संपर्कही केला. लंके यांनी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता दबावाचे कारण पुढे करण्यात आल्याने लंके यांचाही नाईलाज झाला होता. शुक्रवारी पार पडलेल्या मिरवणूकीदरम्यान नागरीकांनी त्यांच्या भावना खा. लंके यांच्याजवळ बोलून दाखविल्या.

# विठू नामाच्या गजरात अलंकापुरी दुमदुमली !

■ संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्थान
■ मुख्यमंत्र्यासह हजारो वारकरी विठू नामात तल्लीन

आळंदी : प्रतिनिधी

**संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आज पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पालखीचे आज आळंदी येथील देऊळवाड्यातून प्रस्थान झाले. यावेळी राज्यभरातील हजारो वारकऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान, यंदा माऊलींच्या पालखीच्या बैलजोडीचा मान आळंदी गावातील कुऱ्हाडे कुटुंबाला मिळाला आहे. या माध्यमातून या कुटुंबाची तब्बल २५ वर्षांची प्रतीक्षा फळाला आली आहे.**



यंदा संत ज्ञानेश्वरांचा पालखी सोहळ्याचे हे १९३ वे वर्ष आहे. आज दुपारी ४ वा. पालखीने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. आज पालखीचा पहिला मुक्काम आळंदी येथीलच दर्शन मंडप इमारत गांधीवाडा येथे असेल. त्यानंतर उद्या ३० जून रोजी पालखी आळंदीहून पुण्याच्या दिशेने प्रस्थान करेल.

**१६ जुलै रोजी पालखी पंढरपुरात पोहोचणार**

१५ जुलै रोजी पालखी वाखरीला पोहोचेल. तर १६ जुलै रोजी वाखरी ते पंढरपूर असा प्रवास होईल. १७ जुलै रोजी मुख्य आषाढी एकादशी पंढरपूर यात्रेचा सोहळा आहे. त्यामुळे २० जुलैपर्यंत माऊलींची पालखी पंढरपूर नगरीतच राहील. त्यानंतर २१ जुलै रोजी वारकरी पालखीसह ग्यानबा तुकारामचा जयघोष करत परतीच्या प्रवासाला आळंदीच्या दिशेने निघतील.

**बैलजोडीचा मान कुऱ्हाडे कुटुंबाला**

माऊलींच्या पालखीचा बैलजोडीचा मान यंदा आळंदी येथील कुऱ्हाडे कुटुंबाला मिळाला आहे. यंदा बैलजोडीच्या मानासाठी कुऱ्हाडे घराण्यातील ७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सहादू बाबुराव कुऱ्हाडे यांच्या बाजी व हौश्या या बैलजोडीला मानाचा पालखी रथ ओढण्याचा मान मिळाला. या कुटुंबाला तब्बल २५ वर्षांनंतर हा मान मिळाला आहे. या बैलांची दरवर्षीप्रमाणे सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

**संत तुकारामांच्या पालखीचा आज आकुर्डीत मुक्काम**

दुसरीकडे, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीने शुक्रवारी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. ग्यानबा तुकारामाच्या जयघोषात ही पालखी १६ जुलै रोजी पंढरपुरात दाखल होईल. ही पालखी आज शनिवारी २९ जून रोजी पहिल्या अभंग आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गाजवळ, तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल. संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात दुसऱ्या मुक्कामाला थांबेल.

**पालखी मार्गावर विविध सोईसुविधा**

पालखीच्या मार्गावर भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याकरिता टँकर उपलब्ध केले आहेत. सिद्धबेट, नदी घाट, नवीन पुलासह संपूर्ण महत्त्वाच्या ठिकाणीची स्वच्छता पूर्ण झाली आहे. वारी कालावधीत ३ पाळ्यांमध्ये साफसफाई केली जाणार आहे. १८००फिरत्या शौचालयांची उपलब्धता केली आहे. दिवाबत्तीची कामे पूर्ण झाली आहे. ६० ठिकाणी १३० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेत. या प्रकरणी ३ बोटी तैनात ठेवण्यात आल्या आहेत.












# प्रगतीमंत्र

## हवा फक्त आत्मविश्वास !

**क्षितिज, एक अत्यंत हुशार आणि आकर्षक असा विशीतील तरूण. असा हा बुद्धिमान तरुण रिटेल क्षेत्रात टीम लीडर म्हणून काम करतो. सविस्तर चर्चा, वादविवादात येणारे अडथळे आणि मनाचा गोंधळ यामुळे क्षितिज समुपदेशन सत्रात सहभागी होण्याचा निर्णय घेतो. एक मनोचिकित्सक आपल्या कामाशी संबंधित समस्या सोडवण्यात मदत करू शकतो, याबाबत त्याच्या मनात शंका मात्र होतीच...**



क्षितिज मनोचिकित्सकाशी संवाद साधण्यास सुरुवात करतो. तो म्हणतो, 'मी नेहमीच गोंधळलेला असतो. कोणतेही काम आत्मविश्वासपूर्वक सुरू करण्यासाठी मला फारच वेळ घ्यावा लागतो. असा माझा अनुभव आहे. मी एखादे काम करू शकतो आणि ते माझ्या आवाक्यातही आहे, याची जाणीव मला नक्कीच असते, मात्र त्या कामाचा परिणाम अपेक्षेप्रमाणे मला कधीही साधता येत नाही. चिंता, काळजी आणि अनिश्चिततेमुळे माझ्यावर परिणाम होतो. परंतु, जेव्हा मी काम हाती घेतो तेव्हा मी माझी सर्व ताकद एकवटून ते करत असतो. माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवर माझी काही उद्दिष्ट्ये आहेत, पण ती पूर्णत्वास नेताना मला बराच विलंब होतो. हाती घेतलेल्या कामात प्रगतीसाठी आवश्यक असलेली निश्चित दिशा ठरवण्याची कुवत माझ्यात नाही किंवा भूतकाळात मला आलेल्या निराशाजनक अनुभवांमुळे हे होत असावे असे वाटते.' क्षितिजचे ध्येय काय आहे, त्याची रोजनिशी कशी आहे, त्याच्या आकांक्षा काय आहेत, तो प्रयत्न कशा प्रकारे करतो, त्याची विचार प्रक्रिया कशी चालते, हे जाणून घेतल्यानंतर अनेक गोष्टींचा उलगडा होत गेला. तो नेहमीच आपले नवे काम सुरू करताना स्वतःला नकारात्मक प्रश्न विचारत राहतो, शंका उपस्थित करत रहातो हे लक्षात आले. मग त्याच प्रकारचे काम त्याने पूर्वी यशस्वीपणे केलेले असले तरी देखील त्याच्यात नवे काम सुरू करताना आत्मविश्वास नसतो हे लक्षात आले. हाती घेतलेल्या कामाबाबत त्याच्याकडे पुरेशी माहिती, तसेच ज्ञान असते. मात्र तरीही शंका, गोंधळ निर्माण होतो. त्याच्यात आत्मविश्वासाचा अभाव असतो आणि याच कारणांमुळे त्याची कामे पूर्णत्वास जात नाहीत किंवा विलंब लागतो असे दिसून आले.

### आत्मविश्वासावर असा होत होता परिणाम...

अपेक्षित यशाचे कल्पनाचित्र जरूर रंगवतोय, मात्र आपल्यापुढील आव्हाने कोणती आहेत आणि प्रक्रियेचा भाग म्हणून ती उभी राहणारच आहेत या विचारांचा क्षितिजमध्ये अभाव आहे. त्याच्या या दृष्टिकोनामुळे त्याचे कल्पनाचित्र अपुरेही पडत होते आणि यामुळे तो आपला आत्मविश्वासही गमावत होता. आपल्यासमोरील आव्हाने पेलण्यात आणि अनिश्चित स्थितीला सामोरे जाण्यात आपण कमी पडत असल्याचे त्याने मान्य केले. पुढे छोटी छोटी कामे हाती घेऊन ती रणनीतीद्वारे पूर्णत्वास नेण्यावर भर देण्यात आला. यामुळे यश आणि अपयशामधील दरी भरून निघण्यास मदत झाली. यानंतर मग हळूहळू मोठी कामे हाती घेण्यात आली. योग्य त्या प्रयत्नांनंतर तो पुढे निर्माण होणाऱ्या समस्यांचा अंदाज घेणे, योजना आखणे, कार्य व्यवस्थापन अशी कौशल्ये विकसित करण्यात यशस्वी झाला. या प्रक्रियेद्वारे त्याने आत्मविश्वास मिळवला आणि समग्र दृष्टिकोनातून परिस्थितीकडे पाहून आकलन करण्याची क्षमता प्राप्त केली. पुढे त्याच्यात रोजचे निर्णय घेण्याची, तसेच मोठे निर्णय घेण्याआधी फायद्यातोट्याच्या दृष्टीने त्या-त्या निर्णयांचे विश्लेषण करण्याची क्षमताही निर्माण झाली. आत्मविश्वास हा एक परिवर्तनशील असा घटक आहे, जो कामाच्या स्वरूपानुसार तसेच त्या-त्या परिस्थितीनुसार बदलत असतो याचे गमकही त्याच्या लक्षात आले.

#### क्षितिज नेमका कशा प्रकारे विचार करत होता...

- मी निश्चित केलेल्या मानकांनुसार काम करू शकेन का?
- मला यश मिळू शकेल का आणि इतर सहकारी माझ्या कामाची दखल घेत प्रशंसा करतील का?
- हे काम पूर्णत्वास नेण्याची क्षमता माझ्यात आहे का?
- मी कामात अपयशी ठरलो तर लोक माझी टर तर उडवणार नाहीत ना?

## आत्मविश्वास वाढण्यासाठी टाळा या चुका!



**आत्मविश्वास आपल्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वपूर्ण पैलू असतो. तो डळमळला की पुढची सगळी गणितं चुकतात. त्यामुळे आत्मविश्वास कमी होईल अशा गोष्टी करणं टाळलं पाहिजे किंवा सवयी बदलल्या पाहिजेत. आपण अनेक कौशल्यांमध्ये निपुण आहोत म्हणजे इतरांपेक्षा वरचढ आहोत अशीही अनेकांची गैरसमजूत असते. त्यामुळे अशा व्यक्ती लगेच हुरळून जातात. काही व्यक्ती ध्येयपूर्तीनं इतके झपाटलेले असतात की, प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करतात. यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो आणि ध्येयपूर्तीला वेग मिळतो. आत्मविश्वास कमी करणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत आणि त्या करणं कसं टाळता येऊ शकतं याविषयी...**


### अति विचार करणं

कोणत्याही गोष्टीचा अति विचार करणं मानसिक आरोग्याच्या दृष्टीनं घातकच असतं. तसंच यामुळे आत्मविश्वासही कमी होतो. मानसिकरित्या सुदृढ असलेले लोक कधीच जास्त विचार करण्यात ऊर्जा वाया घालवत नाहीत. उलट ज्या विचारांनी त्यांचा फायदा होईल ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करतात. कित्येकदा जोखीम पत्करावी लागते. अशा वेळी योग्य विचार करणाऱ्या व्यक्ती यशस्वी ठरतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो.

### जर-तरमध्ये अडकणं...

जर असं असतं तर मी असं केलं असतं. जर मला अमुक एक गोष्ट मिळाली असती तर मी तसं केलं असतं, यामध्ये अनेक जण अडकलेले असतात. सतत याचा विचार करण्यात वेळ वाया घालवतात. यामुळे आत्मविश्वास कमी होतोच शिवाय आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होतो. कदाचित पालकांनी आपल्याला अजून चांगली वागणूक दिली असती, मालकानं आपल्याला जास्त काम करायला लावले नसते, असा विचार करण्यात वेळ घालवणं चुकीचं आहे. त्यापेक्षा हातात असलेल्या वेळेत कामं करुन मोकळं झालं पाहिजे. तसंच जर-तरचा विचार करत बसल्यानं वस्तुस्थिती बदलत नाही. उलट वेळ आणि ऊर्जा वाया जाते. म्हणून आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करुन पुढे मार्गक्रमण केलं पाहिजे.

### काय विचार करतात ?



सहकारी, मित्र- मैत्रिणी किंवा ओळखीतली मंडळी आपल्याबद्दल काय विचार करतात याची कित्येकांना काळजी वाटते. याचा सतत विचार केला तर चांगल्या गोष्टी करण्यापासून मागे राहतो. एखादी व्यक्ती आपल्याबद्दल अमुक प्रकारे विचार करते याची काळजी करत बसलो तर आत्मविश्वास कमी होतो. यामुळे टीका किंवा नकार पत्करावा लागतो. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या कंपनीत नोकरीसाठीच्या मुलाखतीसाठी गेलेला असता. मुलाखत घेणारी व्यक्ती तुमचा मित्र किंवा ओळखीतली निघते. अशा व्यक्तींशी बोलताना तुम्ही हातचं राखून बोलता. कारण तुमचा आत्मविश्वास कमी झालेला असतो.


### मदत करणाऱ्याची तक्रार

आत्मविश्वास कमी असलेल्या व्यक्तींच्या मदतीसाठी अनेक जण धावून आल्याची उदाहरणं आपण पाहिली आहेत. पण काही मंडळी मदत करणाऱ्यांची तक्रार करण्यात वेळ घालवतात. असं न करता प्रत्येक गोष्टीची चांगली बाजू बघता आली पाहिजे.

- स्वतःला दोष देणं : मानसिकदृष्ट्या सक्षम असलेली मंडळी कोणतंही काम पूर्ण जबाबदारीनं स्वीकारतात. अपयश ही यशाची पहिली पायरी असते, असं म्हटलं जातं. त्यामुळे अपयश आलं तर काही व्यक्ती उगाच स्वतःला दोष देत बसत नाहीत. तसं करणं त्यांच्या लेखी निरुपयोगी आणि आत्मविश्वास कमी करणारं असतं. वेळोवेळी स्वतःला माफ करून किंवा मनाची समजूत काढून पुढे कसं जाता येईल याचा विचार करतात.
- नकारात्मक विचार करणं : माझ्यासोबत किती वाईट झालं, याचा विचार करणारी अनेक मंडळी आपल्या अवतीभोवती असतात. आपल्यावर संकट ओढवण्याची किंवा वाईट प्रसंगाना सामोरं जाण्याची भीती अनेकांना सतावत असते. असा नकारात्मक विचारांचा मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. संकटाला कशा प्रकारे सामोरं जाता येईल याचा विचार करायला हवा.
- भूतकाळाचा विचार करणं : सर्वात नकारात्मक आणि आत्मविश्वास कमी करणारी गोष्टी म्हणजे भूतकाळाचा विचार करणं. गत जीवनात घडलेल्या नकारात्मक गोष्टींचा आणि झालेल्या चुकांचा विचार करत बसणारी अनेक मंडळी आहेत. अशा व्यक्ती मानसिकदृष्ट्या अशक्त असतात. यामुळे मनात वाईट आणि नकारात्मक विचार घोळत राहतात. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर असं करणं प्रकर्षानं टाळलं पाहिजे. भूतकाळाचा जास्त विचार न करता भविष्याचा विचार केला पाहिजे.

## आत्मविश्वास जागविताना...

**तुम्हाला स्पष्ट मत खरच देता येते? मला हे जमत नाही म्हणत कायम मागे-मागे राहायचे. इतके की कुणी तुमची दखलच घेत नाही. मी हे करू शकते, असे आत्मविश्वासाने सांगता येत का? आत्मविश्वास हाच तर तो शब्द आहे. सगळे येते, पण बोलण्याचे धाडस नाही. कारण आत्मविश्वास नाही. हा आत्मविश्वास कुठे मिळत नसतो, तर तो स्वतःजवळच असतो आणि त्यालाच बाहेर काढण्याचे काम रश्मी मनसबदार-गुज्जर करतात. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मोटिव्हेशलन स्पीकर व लाइफस्कील कोच रश्मी यश मिळविण्याचे तंत्र शिकवतात. मूळ औरंगाबादकर रश्मी सध्या कॅलिफोर्नियामध्ये वास्तव्यास असून, कॉन्फिडनस कोचिंग टू यू या कंपनीच्या संस्थापक आहेत. औद्योगिक क्षेत्रापासून विद्यार्थी व अगदी सामान्य माणसालाही मार्गदर्शन करणाऱ्या रश्मी यांनी त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर केले आहेत.**




निर्णय घेण्याची क्षमता तुमच्यात असल्याने तुमच्या समस्यांमधून बाहेर पडता येते. खासगी आयुष्य आणि करिअर यातील समतोल साधता येतो. आवश्यकता आहे ती स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मविश्वासाने जीवन जगण्याची आणि जीवनकौशल्यांना योग्य दिशा देण्याची. प्रत्येकाला आत्मविश्वासाचे धडे देण्याची माझी धडपड असते व तेच माझे काम आहे, असे रश्मी मनसबदार-गुज्जर सांगतात. मी विकसित केलेले तंत्र अगोदर स्वतः उपयोगात आणले. मी स्वतःही अनेकदा अडचणीत सापडले होते. मदतीची गरज मलाही होती, पण कोणत्याही परिस्थितीत स्वतःवरील आत्मविश्वास गमाविला नाही. जे करायचे ते आत्मविश्वासाने व हेच मी आज दुसऱ्यांना शिकविते, असे रश्मी सांगतात. याची सुरुवात लहानपणाच झाली होती. वडील शशीकुमार मनसबदार व्यावसायिक, तर आई कमलेश शिक्षक. मोठा भाऊ शिशीर व मला वाढवतानी आई-बाबांनी संस्कार तर दिलेच, पण तू मुलगी आहेस म्हणून हे कर, ते नको करू, असे अजिबात शिकविले नाही. त्यामुळे मला जे आवडायचे मी तेच करायचे. वडिलांच्या व्यक्तिमत्वाचा थेट परिणाम व्हायचा. त्यांची संवाद साधण्याची कला, पटवून देण्याचे कसब पाहून आपणही असेच काही करायचे, असे वाटायचे. एक गोष्ट ते कायम सांगायचे. जे करायचे ते कर, पण स्वतःच्या हिमतीवर. असाच एक प्रसंग आठवीत असताना घडला. शाळा, अभ्यास सांभाळून भरतनाट्यमच्या वर्गाकरता मला सिटीबसने जावे लागायचे. रोजच्या या त्रासाला मी फार कंटाळले होते. बाबांकडे सायकलचा आग्रह धरला, तर ते म्हणाले, सायकल हवी आहे ना मग ती तुझ्या हिमतीवर घे. पैठण गेटवर बँक ऑफ बडोदाची शाखा आहे तिथे जा आणि अमूक माणसाला भेट. ती व्यक्ती तिथली शाखा व्यवस्थापक होती. मी बँकेत गेले आणि सायकल मला किती गरजेची आहे, हे त्यांना पटवून दिले. माझी जिद्द पाहून त्यांनी माझी सर्वांशी ओळख करून दिली आणि सांगितले, आपल्या शाखेच्या सर्वात लहान कर्जदाराला लवकर कर्ज द्या. या प्रसंगातून एक लक्षात आले की, जगात अशक्य असे काहीच नसते. केवळ प्रश्न विचारायची तयारी असावी. लहान वयातच आलेला हा स्वावलंबीपणा मी नंतरही जोपासला, असे त्यांनी सांगितले. होलिक्रॉस शाळेत दहावीपर्यंतचे शिक्षण, देवगिरी कॉलेजमधून बारावी पूर्ण करतानी मी एनसीसीमध्ये सहभागी झाले. त्यामुळे मला कमालीची शिस्त लागली होती. एनसीसीचे २७ कॅम्प पूर्ण केले असल्याने आपण डिफेन्समध्ये जायचे किंवा आयपीएस व्हावे, असे ठरवून टाकले, पण इंजिनीअरिंगमध्ये काही जागा एनसीसीच्या कोट्यासाठी राखीव असतात व याचा पुढे फायदा होईल म्हणून काहीशा अनिच्छेनेच गव्हमेंट कॉलेजमधून बी. ई. झाले. व्यवस्थापन शाखेची आवड असल्याने पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एमबीएला प्रवेश घेतला. यादरम्यान डिफेन्स मागे राहिले आणि रश्मी व्यवस्थापनामध्ये रुळल्या.


### तुझ्या हिमतीवर कर...



जे करायचे ते तुझ्या हिमतीवर कर, ही वडिलांची शिकवण असल्याने सकाळी एमआयटी कॉलेजमध्ये शिकवायला जाणे, दुपारी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचे क्लास घेणे आणि संध्याकाळी एमबीएचा वर्ग करणे, असा रश्मी यांचा दिनक्रम होता. एमबीएच्या दुसऱ्या वर्षी फार्मास्युटिकल सेल्समन मनिष गुज्जर यांच्यासोबत विवाह झाला व नंतर त्या कॅलिफोर्नियाला स्थायिक झाल्या. 'परदेशात पाऊल टाकताच तुम्हाला एकदम हतबल झाल्यासारखे वाटते. सुरुवातीचे काही दिवस माझ्यासोबतही असेच झाले. आपले माणूस म्हणून कुणी बोलायला नाही. लोक मदत करायची, पण तेथील जीवन खूप वेगळे असते. मुलांना एकटे सोडून बाहेर जाता येत नाही. तेथे काम, घर सांभाळा हे सगळे सोपे नसते,' असे रश्मी सांगतात, पण उशिरा का होईना सुरुवात झाली आणि त्यांनी ओरॅकल कार्पोरेशन, कॉम्पॅक, एचपी अशा काही कंपन्यांत काम केले. यादरम्यान मला सतत जाणवायचे की, या क्षेत्रात प्रत्येकाला अडचणी आहेत. कॉर्पोरेट आयुष्य चकाकणारे भासते, पण प्रत्येक व्यक्ती भरडली जातो. हळूहळू रश्मी यांनी सहकाऱ्यांसाठी क्लास घेणे सुरू केले. वीकेंडला रश्मींच्या घरीच वर्ग चालायचे. तेव्हा जॉब आणि घर सांभाळून त्या क्लास घ्यायच्या. आता मात्र लक्ष्य स्पष्ट होते की, पुढे याच क्षेत्रात स्थिर व्हायचे.

### संधी मिळते ते करा...

रश्मी सांगतात की, एनसीसीमध्ये एक गोष्ट शिकविली जाते. तुम्ही एक साधे सैनिक असला तरी लढाईत तुम्ही तितकेच महत्त्वाचे असता. त्यामुळे जे करण्याची संधी मिळते ते करा. मी कॅलिफोर्नियाला होते. माझा जॉब, कुटुंब सगळ ओके होते, पण मला वाटायचे की, आपण एक स्पीकर म्हणून याही वयात करिअर करू शकतो. कॉन्फिडन्स कोचिंग टू यू कंपनी स्थापन केली. या कंपनीअंतर्गत मोटिव्हेशनल स्पीकर व लाइफ-स्कील कोच ट्रेनिंग रश्मी देतात. यामध्ये विद्यार्थी, कार्पोरेटसह गृहिणीही आहेत. येथील नागरिक शिक्षणामध्ये पैसे गुंतवतात. साठ वर्षांचे आजी-आजोबाही शिकण्यासाठी उत्सुक असतात. स्वतःमधली उणीव ते मान्यही करतात आणि कुणाकडूनही शिकण्यासाठी तयार असतात. मूल्यांचे शिक्षण संपूर्ण आयुष्य बदलून टाकते. ही मूल्ये प्रत्येकालाचा आवश्यक आहेत. लाइफ स्कील कोच म्हणून मी डिफाइन, डिझाइन व डिप्लॉय या त्रिसूत्रीवर आधारित मॉडेल विकसित केले आणि या आधारे त्यांना शिकविते, असे रश्मी सांगतात. अचिव्ह यूअर ड्रीम विथ इज सारख्या पुस्तकाच्या लेखक असलेल्या रश्मी जीवनकौशल्ये शिक्षण देण्यासाठी कायम भ्रमंतीवर असतात. माझी



कंपनी मला प्रॉफिट देत नाही, पण वयाच्या ४१व्या वर्षी रिटायर्डमेंट घेतल्यानंतर मी जेथे संधी मिळाली तेथे माझ्या क्लायंटचे आयुष्य बदलले व त्याचा मला अभिमान आहे. या अनुषंगानेच वर्षातून एकदा भारतात येते व कार्यशाळा घेते, असे रश्मी नमूद करतात.

## शॉर्ट न्यूज

### कारवाईस महसुल प्रशासनाची टाळाटाळ

■ **भिंगार :** जवळील बाराबाभळी परिसरात बेकायदेशीर मुरूम उत्खनन करणाऱ्या माफियांवर व सदरची माहिती देऊन देखील संबंधितांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तहसिलदार, तलाठी व सर्कल यांच्यावर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय मेहतर समाज संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांची भेट घेऊन सदर मागणीचे निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष सनी खरारे, जिल्हा सचिव प्रशांत पाटोळे, विकास पंडित, दिपक नकवाल, प्रविण घावरी, संजय खरे आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांकडून वृक्षदिंडीद्वारे जगजागृती

■ **संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील हरित सेना प्रकल्प व सामाजिक वननिकरण विभाग, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी व विद्यार्थिनींनी गावातून वृक्षदिंडी काढत वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली. यानिमित्ताने विद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थीनींनी एक विद्यार्थी, एक वृक्ष संकल्पना राबविण्याचा निर्धार केला.

### पुणतांबा येथील रेल्वे फाटक पुन्हा बंद

■ **पुणतांबा :** येथील स्टेशन रोडच्या उत्तर बाजूला नव्याने सुरु केलेल्या रेल्वे फाटकाच्या ठिकाणी रेल्वे ट्रॅकची दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा रेल्वे फाटक बंद ठेवण्यात आल्यामुळे पुणतांबा मार्गे कोपरगाव व श्रीरामपूरकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे. दुरुस्तीच्या कामासाठी पुणतांबा येथील रेल्वे फाटक बंद असल्याबाबत रेल्वे खात्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने येथील गणपती फाट्याजवळ कोणताही फलक लावला नसल्यामुळे अनेक वाहन चालकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले.

### तिसगावमध्ये जागा खरेदीचे घोटाळे

■ **पाथर्डी :** तालुक्यातील तिसगावमध्ये उद्योग व्यवसाय करण्यासाठी बाहेरगावातील लोक या ठिकाणी हक्काची जागा विकत घेऊन त्या ठिकाणी व्यवसाय करण्याचा प्रयत्न करतात परंतु बाहेरगावच्या लोकांची गरज ओळखून तिसगाव मधील काही व्यक्ती आता या गरजू लोकांना जागा विकायची आणि पुन्हा त्याच जागेवर काही दिवसांनी कब्जा मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार एका जागा विक्रीच्या प्रकरणावरून समोर आले आहे. या जागा विक्री बाबत ग्रामपंचायतच्या मासिक मीटिंगमध्येच नेमकी चर्चा झाल्याने हा संपूर्ण प्रकार आता तिसगावकरांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

### अहिरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

■ **कोपरगाव :** आत्मा मालिक माध्यमिक गुरुकुलचे शिक्षक सागर अहिरे यांना क्रीडा संस्कृती फाउंडेशनच्या वतीने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शिक्षकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. सन २०२४-२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सागर अहिरे यांना अर्जुन पुरस्कार विजेते पद्मश्री ब्रह्मानंद सांगून कामत शंकरवाल यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवछत्रपती पुरस्कार विजेते गोरखनाथ बलकवडे होते.

# अर्थसंकल्पातून सामाजिक उत्कर्षाचा प्रयत्न : ना.विखे

## संत ज्ञानेश्वर मंदिराचा आराखडा तयार करण्याच्या निर्णयाचे केले स्वागत

**लोणी : प्रतिनिधी**



**महायुती सरकारचा लोककल्याणकारी अर्थसंकल्प शेतकरी, महीला आणि युवक यांच्या उत्कर्षाचा असून, गायीच्या दूध करीता पाच रुपयांच्या अनुदानासह महिलांना प्रोत्साहन युवकांना संधी आणि वारकरी बांधवाना सामाजिक सुरक्षा देणाऱ्या अर्थसंकल्पातून सामाजिक उत्कर्ष साध्य करण्याचा प्रयत्न यशस्वी होईल.नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराचा विकास आराखडा तयार करण्याच्या निर्णयाचे महसूल, पशुसंवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वागत केले आहे.**

राज्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असल्याचा संदेश आजच्या या अर्थसंकल्पातून मिळाला असून, पीकविमा योजने बरोबरच नमो किसान सन्मान योजना, सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना पाच हजार कोटी रुपयांची मदत, कांदा उत्पादकांना अनुदान देण्याच्या निर्णया बरोबरच गायीच्या दूधासाठी १ जुलै २०२४ पासून पाच रुपयांचे अनुदान देण्याच्या निर्णयाचे मंत्री विखे पाटील यांनी स्वागत केले आहे. दूग्ध व्यवसायाला पाठबळ देताना अहिल्यादेवी मेंढी शेळी पालन विकास महामंडळातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासही दिलेली चालना महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण,तसेच मुलीना मोफत शिक्षण व परीक्षा शुल्क माफ करण्याच्या निर्णया बरोबरच राज्यातील अंगणवाडी सेविका,अंगणवाडी मदतनीस आणि बचत गटातील महीलांना मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळ देण्याची तरतुद निश्चितच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणा करीता महत्वपूर्ण आहे.

अहिल्यानगर मधील श्री.संत ज्ञानेश्वर मंदिराच्या विकासासाठी आराखडा तयार करण्यासाठी अर्थसंकल्पातून करण्यात आलेल्या निर्णयाचे आपण स्वागत करीत असून, जिल्ह्याच्या तिर्थक्षेत्र पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत होणाऱ्या ज्ञानेश्वर सृष्टीचे स्वप्न महायुती सरकारच्या सहकार्याने पुर्णत्वास जाईल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

# सरकारला शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबद्दल काहीही देणेघेणे नाही

## आ. बाळासाहेब थोरात यांची विधानसभेत टीका

**मुंबई : प्रतिनिधी**



**मागील वर्ष हे दुष्काळाचे असतानाही शेतकऱ्यांनी अतोनात कष्ट करून पिके आणली. मात्र, जानेवारीमध्ये झालेल्या वादळी वाऱ्यामुळे फळबागा व या बारमाही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. आता जुलै महिना उजाडला आहे. शेतकऱ्यांच्या फळबागा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सहा महिने होऊनही अद्याप सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नाही. हे दुर्दैवी आहे. याचाच अर्थ सरकारला शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबद्दल काहीही देणेघेणे नाही, अशी टीका काँग्रेसचे आमदार बाळासाहेब थोरात यांनी विधानसभेत केली.**

आ.थोरात म्हणाले की, रब्बी हंगामात नुकसान झाले, आता खरीप हंगाम सुरू आहे. शेतकऱ्यांना पुन्हा पिकाची उभारणी करायची आहे, त्यांच्यासमोर अनेक अडचणी आहे, अतिवृष्टी व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाची मदत त्वरित मिळणे गरजेचे आहे. मात्र, या मदतीला फारच विलंब झाला आहे. हे चुकीचे असून या अधिवेशनात याबाबत तातडीने निर्णय झाला पाहिजे, अशी मागणी थोरात यांनी केली.

# ३७ लाखाच्या बैलावरून झालेला गोळीबार जीवावर

## बारामतीतील रणजित निंबाळकरचा अखेर मृत्यू

**बारामती : प्रतिनिधी**



**बारामती तालुक्यातील सोमेश्वर कारखान्याचे माजी अध्यक्ष शहाजीराव काकडे यांच्या निंबुत येथील निवासस्थानी गुरूवारी रात्री गोळीबार झाला होता. या गोळीबारात जखमी झालेल्या रणजित निंबाळकर यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू आहे.याप्रकरणी निंबाळकर यांच्या पत्नी अंकिता निंबाळकर यांनी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी गुन्हा गौतम काकडे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे,तर एकाचा तपास अद्याप सुरू आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फलटणचे रणजित निंबाळकर यांनी शहाजीराव काकडे यांचा मुलगा गौतम काकडे यांना 'सुंदर' नावाचा बैल विकला होता. बैल विक्री करताना या विक्रीची किंमत ३७ लाख रुपये इतकी ठरली होती. त्यातील पाच लाख रूपये त्यांनी निंबाळकर यांना दिले होते, तर उर्वरित रक्कम घेण्यासाठी गुरूवारी (२७ जून) रात्री ११ च्या सुमारात रणजित निंबाळकर त्यांच्या पत्नी आणि मुलांसोबतच गौतम काकडे यांच्या निवासस्थानी गेले होते.

गौतम काकडे यांनी, "मी तुम्हाला पैसे दिले नाहीत, असं तुम्ही संतोष तोडकर यांना का सांगितलं? तुम्ही असे बोलायला नको होते, तुम्ही आता स्टॅम्प पेपरवर सही करा. मी तुम्हाला सकाळी पैसे देतो." असे म्हटले. त्यावर रणजित निंबाळकर म्हणाले, तुम्ही माझे राहिलेले पैसे द्या मी लगेच सही करतो, आणि तुम्हाला जर व्यवहार पुर्ण करायचा नसेल तर मी तुम्हाला तुमचे पाच लाख रूपये परत देतो, तुम्ही माझा बैल मला परत द्या.गौतम यांनी त्यांचा भाऊ गौरव काकडे यांनाही बोलावून घेतले. त्यावेळी गौरव यांच्यासह आणखी तीनजणही तिथे आले. बोलण्याबोलण्यात त्यांच्यातील वाद विकोपाला गेला. अशातच गौरवने त्याच्याकडे असलेल्या पिस्तुलातून रणजित यांच्यावर गोळी झाडली. रणजित जखमी झाले. हा प्रकारानंतर रणजित यांच्या पत्नीने त्यांना उपचारासाठी पुण्यात दाखल केले. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात बारामती पोलिसांनी शहाजीराव काकडे, गौतम काकडे यांना अटक केली असून गौरव काकडे आणि त्यांच्या साथीदाराचा शोध सुरू आहे.

# राहाता येथे कांद्याला ३२०० तर पारनेरमध्ये ३१०० रुपयांपर्यंत भाव

## राहाता बाजार समितीत डाळिंबाची ८ हजार ९६६ क्रेट आवक

**राहाता / पारनेर : प्रतिनिधी**



**राहाता बाजार समितीत कांद्याला शुक्रवारी प्रतिक्विंटल ३२०० रुपयांपर्यंत भाव मिळाला, तर १० हजार ७९१ कांदा गोण्यांची आवक झाली होती. पारनेर बाजार समितीमध्ये शुक्रवारी १० हजार ८५८ कांदा गोण्यांची आवक झाली होती. यावेळी बाजार समितीमध्ये झालेल्या लिलावात एक नंबर कांद्याला प्रतिक्विंटल ३००० ते ३१०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.**

राहाता बाजार समितीत एक नंबर कांद्याला प्रतिक्विंटल २५०० ते ३२०० रुपये, दोन नंबर कांद्याला १८५० ते २४५० रुपये, तीन नंबर कांद्याला ११०० ते १८०० रुपये, गोल्टी कांदा २१०० ते २४००, तर जोड कांद्याला ५०० ते १००० रुपये भाव मिळाला. पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात शुक्रवारी गावरान कांद्याचे लिलाव झाले. यावेळी बाजार समितीत तालुकाभरातून १० हजार ८५८ गावरान कांदा गोण्यांची आवक झाली होती. यावेळी कांदा लिलावात एक नंबर कांद्याला प्रतिक्विंटल ३००० ते ३१०० रुपये, दोन नंबर कांद्याला २७०० ते २९०० रुपये, तीन नंबर कांद्याला १६०० ते २३०० रुपये, चार नंबर कांद्याला १००० ते १५०० रुपये, तर गोल्टी कांद्याला प्रतिक्वंटल २००० ते २५०० रुपये भाव मिळाला.

पारनेर बाजार समितीत मागील आठ ते दहा दिवसांपासून कांद्याचे भाव स्थिर असल्याचे लिलावावरून दिसून येत आहे. यावेळी झालेल्या लिलावात ९२० कांदा गोण्यांना प्रतिक्विंटल १००० ते १५०० रुपये भाव मिळाला. २००४ कांदा गोण्यांना १५०१ ते २००० रुपये, तर ४ हजार २६७ कांदा गोण्यांना लिलावात २००१ ते २५०० रुपये, ३५८२ कांदा गोण्यांना २५०१ ते ३००० रुपये भाव मिळाला. तर फक्त ८५ गोण्यांच्या लॉटला प्रतिक्विंटल ३१०० रुपये भाव मिळाला आहे, अशी माहिती पारनेर बाजार समितीचे सभापती बाबासाहेब तरटे यांनी दिली.

शेतकऱ्यांनी कांदा विक्रीसाठी आणताना त्याची प्रतवारी करून दर्जेदार कांदा विक्रीसाठी आणावा. चांगल्या कांद्याला चांगला दर मिळत आहे. पूर्वी या हंगामात कांदा मार्केट बंद रहायचे. परंतु आता वर्षभर आवक सुरू असल्याने लिलाव वर्षभर होत आहेत, अशी माहिती पारनेर बाजार समितीचे उपसभापती भाऊसाहेब शिर्के यांनी दिली.


**राहाता बाजार समितीत डाळिंबाला प्रतिकिलो २०५ रुपयांपर्यंत भाव**

राहाता बाजार समितीत शुक्रवारी ८ हजार ९६६ क्रेट डाळिंबाची आवक झाली होती. यावेळी झालेल्या लिलावात एक नंबर दर्जाच्या डाळिंबाला प्रतिकिलो १४६ ते २०५ रुपये, दोन नंबर डाळिंबाला ८६ ते १४५ रुपये, तीन नंबर डाळिंबाला ३६ ते ८५ रुपये, तर चार नंबर डाळिंबाला प्रतिकिलो १० ते ३५ रुपये भाव मिळाला, अशी माहिती राहाता बाजार समितीचे सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# सासरकडच्या त्रासाला कंटाळून एकाची आत्महत्या

## सहा जणांना सक्तमजुरीची शिक्षा

**नगर : प्रतिनिधी**



**सासरवाडीतील लोकांच्या जाचाला कंटाळून राहुरी तालुक्यातील वरवंडी येथील रोहित कचरू लांडगे याने आत्महत्या केली होती. या प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने सहा जणांना दोषी ठरवले. त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या गुन्ह्यात पाच वर्षे सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास एक महिना साध्या कैदेची शिक्षा, मानसिक त्रास होईल असे वर्तन केल्याच्या गुन्ह्यात सहा महिने सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास १५ दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा ठोठावली आहे. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता मंगेश दिवाणे यांनी काम पाहिले.**

रोहितच्या आत्महत्येसंदर्भात त्याची आई शिवबाई कचरू लांडगे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. या फिर्यादीत म्हटले होते की, रोहित व शिवानी यांचे लग्न झाले होते. शिवानीला नेण्यासाठी तिच्या माहेरच्या बिट्टूबाई मारुती शिनगारे, सीमा रावसाहेब बोरुडे, सतीश रावसाहेब बोरुडे, मोईन अमीर शेख, शरद राजाराम शिंदे (सर्व रा. डिग्रस, ता. राहुरी) हे १५ एप्रिल २०२१ रोजी आले होते. त्यावेळी रोहितने सतीश बोरुडे हा शिवानीला नेण्यासाठी का येतो, असे म्हणत वाद घातला. त्यातून रोहितच्या सासरकडच्या लोकांनी त्याला मारहाण केली. तसेच अपशब्द ऐकविले. त्यामुळे त्याने १६ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ७.३० वाजता आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त करणे व मानसिक त्रास होईल असे वर्तन करण्याचा गुन्हा दाखल करून घेतला.

राहुरी पोलिसांनी या प्रकरणात न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सरकारी पक्षातर्फे ८ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात फिर्यादी, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. न्यायालयाने सर्व साक्षी पुराव्यांच्या आधारे शिक्षा सुनावली.






# छत्रपती शाहूंच्या समतेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा

## प्राचार्य लक्ष्मणराव मतकर यांचे आवाहन



**पारनेर : प्रतिनिधी**

**छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या समतेचा आदर्श डोळयापुढे ठेवण्याचे आवाहन पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी केले.**

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पारनेर शहरातील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे यांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ मतकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन कार्याचा आढावा डॉ. मतकर यांनी यावेळी बोलताना घेतला. शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी कामांचा आदर्श जपून त्यांच्या विचारांचा वारसा सर्वार्थाने पुढे घेऊन जाण्याचे आवाहन डॉ. मतकर यांनी केले.

प्रा. अशोक शिंदे यांनी शाहू महाराज यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहीती आपल्या भाषणातून दिली. जे पालक आपल्या मुलांना शाळेमध्ये पाठविणार नाहीत अशा पालकांना शाहू महाराजांनी एक रूपया दंडाची शिक्षा ठोठावली होती. छत्रपती शाहू महाराजांनी अनेक लोककल्याणकारी योजना राबवून जनतेच्या हिताचा पुरस्कार केल्याचे शिंदे म्हणाले.

या कार्यक्रमाप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाच पर्यवेक्षक प्रा. संजय कोल्हे, कार्यालयीन अधिक्षक सावकार काकडे, सांस्कृतीक विभागाचे प्रमुख संदीप जमदाडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा मराठाला शाहू महाराजांचा वारसा

**१०५ वर्षांची परंपरा सांगणारी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी संस्था आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कला, क्रीडा व शिक्षणासाठी राजाश्रय दिला. सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला. शाहू महाराजांनी विविध जाती धर्मातल्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची स्थापना केली.**

**प्रा. अशोक शिंदे**

# रामचंद्र थोरात समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

## सामाजिक, धार्मिक कार्याची दखल



**ढवळपुरी : प्रतिनिधी**

**जय मल्हार शैक्षणिक बहुउद्देशीय सामाजिक संस्था व यशवंत सेना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय समाजभूषण ढवळपुरी येथील रामचंद्र थोरात यांना नुकताच समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमामध्ये पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील रहिवासी रामचंद्र थोरात यांना सामाजिक व धार्मिक कार्याबद्दल समाजभूषण हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मल्हार सेनेचे सरचिटणीस मच्छिंद्र बिडगर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय तमनर, जय मल्हार शैक्षणिक बहुउद्देशीय अध्यक्ष कांतीलाल जाडकर, समाधान बागल,प्रहार सरचिटणीस नाशिक जिल्हा शशिकांत कोथमिरे, रंगनाथ तमनर, श्रावण महाराज वाघमोडे,पत्रकार रमेश खेमनर, राजेंद्र पोकळे,संदेश रपारिया,प्रेमानंद महाराज शास्त्री ,दिव्यांग प्रहार संघटनेचे अप्पासाहेब ढोकणे,गोविंद तमनर आदी. मान्यवर उपस्थित होते.रामचंद्र थोरात यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरातून स्वागत होत आहे.

# सुजित पाटलांच्या उपस्थितीत भैरवनाथ मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान

## पाटलांकडून ११ हजार रूपयांची देणगी

**पुणेवाडी : प्रतिनिधी**

**पुणेवाडी येथील श्री. भैरवनाथ प्रासादिक पायी दिंडी सोहळयाचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या उपस्थितीत प्रस्थान झाले. पाटील यांच्याकडून पंढरपुरला निघालेल्या आषाढी पायी दिंडी सोहळयासाठी ११ हजार रूपयांची देणगी देण्यात आली.**



पुणेवाडी येथील श्री.भैरवनाथ प्रासादिक मंडळाच्या आषाढी वारी सोहळयाचे सुजित पाटील यांच्या उपस्थितीत प्रस्थान झाले.

यावेळी बोलताना सुजित पाटील म्हणाले, पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान आणिक दर्शन विठोबाचे या इच्छेपोटी वारकरी आषाढी वारी चुकवत नाहीत. अशी भागवत सांप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिला, पुरूषांच्या मनात आदराचे आणि श्रध्देचे स्थान बाळगून असल्याचे मानले जात असल्याचे झावरे पाटील म्हणाले.

यावेळी मा. सरपंच बाळासाहेब रेपाळे, बाजार समितीचे मा. संचालक मारूती रेपाळे, सुहास पुजारी, रामचंद्र महाराज बोरूडे, संदीप औटी, तुषार सोनवणे, ब्रम्हदेव महाराज ननावरे, हरिभाउ रेपाळे, महादू रेपाळे, साहेबराव मते, भिमराव गायकवाड, बन्सी रेपाळे, विलास सोनावळे, भाऊसाहेब सागर, सबाजी वाळुंज, भास्कर गाडे, शोभा गाडे, लंका वाळुंज, आशा ठुबे, भाऊसाहेब सोनावळे, बबन बनकर, रमाजी ठुबे, मीराताई वाघमारे, अलका ठुबे, मीरा झावरे, किसन नवले, लिलाबाई रेपाळे, विठाबाई रेपाळे, मीरा पोटे, नंदाबाई लांडे, मंजुळा रेपाळे, किसन रेपाळे, सुदाम रेपाळे, उषा मंदीलकर, महेंद्र साळवे, शारदा मते, नंदा गायखे आदी उपस्थित होते.

### पाटलांची फुगडी !

**सुजित पाटील यांनी यावेळी बाजार समितीचे मा. संचालक मारूती रेपाळे यांच्या सोबत फुगडी खेळत वारकऱ्यांचा आनंद द्विगुणीत केला. यावेळी भक्तीगित सादर करीत झावरे यांनी वारकरी बांधवांकडून वाहवा मिळविली. त्यांच्या वतीने वारकऱ्यांना उन्हापासून संरक्षण होण्यासाठी टोप्यांचेही वितरण करण्यात आले.**

# मुख्याध्यापक गीताराम भागाजी जगदाळे यांचे निधन

## कडक शिस्तीचे मुख्याध्यापक हरपले



**वासुंदे : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील रहिवाशी श्री. गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे संचालक संगमनेर तालुक्यातील शिंदोडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गिताराम भागाजी जगदाळे यांचे हृदयविकाराचा तीव्र झटक्याने उपचारादरम्यान निधन झाले. प्रगल्भ विचारसरणी कडक शिस्तीचे मुख्याध्यापक गीताराम भागाजी जगदाळे यांचे अचानक निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.**

गीताराम जगदाळे हे नेहमीच सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असायचे वासुंदे येथे स्थापन करण्यात आलेल्या गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे ते संस्थापक संचालक होते तसेच ते शिक्षक संघटनेमध्ये ही सक्रिय होते. शिक्षक बँकांच्या निवडणुकांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. जिल्हा परिषद शिक्षक म्हणून ते आदर्श शिक्षक होते त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडविले. परिसरामध्ये एक प्रेमळ व्यक्ती म्हणून ते सर्वांना परिचित होते.

# पाल्यांना व्यवसायाबरोबरच उच्च शिक्षणही द्यावे

## ■ उद्योजक राजेश भंडारी यांची अपेक्षा ■ पारनेर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पारनेर : प्रतिनिधी**

**समाजबांधवांनी आपल्या पाल्यांना व्यवसायाबरोबरच उच्च शिक्षण दिले पाहिजे अशी अपेक्षा पारनेर तालुका जैन समाज संघटनेचे अध्यक्ष उद्योजक राजेश भंडारी यांनी व्यक्त केली.**

अध्यक्ष भंडारी यांच्या संकल्पनेतून दहावी व बारावीच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे पारनेर येथील जैन भवन येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भंडारी हे बोलत होते. जैन महासंघाचे संस्थापक कुंदनकाका साखला हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलताना भंडारी म्हणाले, माहीती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले असून त्यामुळेच प्रत्येक पाल्याला उच्च शिक्षण दिले पाहिजे असे आपले मत आहे. त्यामुळेंच समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

यावेळी बाजार समितीचे संचालक चंदन भळगट, उपाध्यक्ष प्रसाद कर्नावट, खजिनदार विलास कटारिया, सरचिटणीस पंकज पिपाडा, सोशल मीडिया समन्वयक यश लोढा, शुभम गुंदेचा, अरूण भंडारी, शेषमल बोरा, डॉ. प्रमोद पितळे, सावरगांवचे सरपंच प्रदीप गुगळे, बाबुलाल बोरा, संतोष गांधी, देवेंद्र गांधी, चंदन गांधी, आनंद गांधी, संदेश बाबेल, सतीश भंडारी यांच्यासह महिला भगिनी उपस्थित होत्या.

### समाजबांधवांनी उपक्रमांचा लाभ घ्यावा

**पारनेर तालुका जैन समाज संघटना सामाजिक, शैक्षणिक व धार्मीक उपक्रम राबविण्यात योगदान देत असून समाजबांधवांनी त्याचा लाभ घ्यावा. सर्व उपक्रमात समाज बांधवांनी मोठया प्रमाणात योगदान द्यावे.**

**सचिन साखला**
**सचिव पारनेर तालुक**

# रासायनिक खतांचा पुरवठा सुरळीत व्हावा

## प्रसाद खामकर यांची पणन महासंघाकडे मागणी

**सुपा : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, नगर तालुक्यात यावेळी मुबलक प्रमाणात पाऊस झाल्या मुळे शेतकरी वर्ग सुखावला आहे.**



त्यामुळे विविध पिकांच्या पेरण्या व लागवडीस वेग आला आहे. आणि अशातच पारनेर , श्रीगोंदा आणि तालुक्यात रासायनिक खतांचा तुडवडा जाणवत आहे. त्यामुळे रासायनिक खतांचा पुरवठा सुरळीत करण्याची मागणी शेतकरी प्रतिनिधी प्रसाद खामकर यांनी पणन महासंघाच्या अध्यक्षांकडे केली आहे.

अनेक कृषी केंद्र हे मनमानी स्वरूपात अवास्तव दराणे. रासायनिक खतांची विक्री करत आहेत. आणि त्यामुळे शेतीला पाहीजे तेवढा खतांचा पुरवठा होत नाही.आणि यामुळे शेतकरी वर्गात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य पणन महासंघाकडुन गाव स्तरावरील सेवा सोसायटी आणि तालुका कृषी सहकारी संस्थामार्फत खतांचा पुरवठा शेतकरी वर्गाला करावा अशी मागणी पारनेर तालुक्यातील शेतकरी प्रतिनिधी प्रसाद खामकर यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांना केली आहे. पानसरे यांनी मागणीला उचित प्रतिसाद देत संबंधित अधिकारी यांना आदेश निर्गमित केले. यावेळी महाप्रबंधक श्री सावंत, श्री भोकरे आणि श्री यादव उपस्थित होते.

# नववधूवरांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप

## भालेराव बंधूंनी जपली सामाजिक बांधिलकी



**ढवळपुरी : प्रतिनिधी**

**ढवळपुरी येथील खारवाडीतील गायकवाड परिवारातील विवाह सोहळा नुकताच संपन्न झाला.या सोहळ्यात अनावश्यक खर्चाला फाटा देत आपल्या नातेवाईकांच्या विवाहप्रित्यर्थ भालेराव बंधूंनी नववधूवरांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.**

खारवाडी येथील चंद्रकांत भालेराव व त्यांचे बंधू नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्यास आहेत. मात्र त्यांची आपल्या मायभूमीशी असलेली नाळ कायम आहे. खारवाडी या छोट्याशा वाडीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भालेराव बंधू कायमच मदत करीत असतात. आपल्या वस्तीवरील सर्वसामान्य घरातील मुले शिकुन मोठे व्हावीत अशीच त्यांची धारणा असते.

खारवाडी प्राथमिक शाळेसाठी यापूर्वी देखील त्यांनी संगणक, शुद्ध पाण्याचे यंत्र, शालेय साहित्याची मदत केलेली आहे. नुकताच त्यांच्या नातेवाईकातील गायकवाड परिवारातील चि.सुरज व चि.सौ.कां.पुनम यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. या वेळी अनावश्यक खर्चाला फाटा देवून भालेराव बंधूंनी नववधूवरांच्या हस्ते ५० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून वेगळा आदर्श निर्माण केला.

यावेळी ढवळपुरी सेवा संस्थेचे अध्यक्ष भागाजी गावडे तसेच भालेराव कुटुंबातील चंद्रकांत भालेराव,राजेंद्र भालेराव,अनिता भालेराव,आदित्य भालेराव,शशिकांत भालेराव , आकाश भालेराव, प्राथमिक शिक्षक बाळासाहेब रोहोकले, परिसरातील गरजू विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन बी.एम. कोतकर यांनी केले तर चंद्रकांत नरसाळे यांनी आभार मानले.

### कोरोना काळातही मदत

**कोरोना काळात खा.नीलेश लंके यांनी भाळवणी येथे उभारलेल्या शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरातील रूग्णांना ऑक्सीजन पुरवठयासाठी भालेराव बंधूंनी सुमारे लाख रुपये किंमतीचे ऑक्सीजन कंसंट्रेटर मशीन देवून रूग्णांसाठी मदत केली होती. त्यांच्या या मदतीचे त्यावेळी लंके यांनी कौतुक केले होते.**

# गावोगावी जावून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणार

## शाखाधिकारी शैला गायकवाड यांचे प्रतिपादन

**जातेगाव/ सुपा : प्रतिनिधी**

**भारत हा कृषिप्रधान देश आहे शेतकरी वाचला तर देश वाचेल, दिवसेंदिवस काही शेतकरी हा शेतीसाठी खाजगी सावकाराकडून कर्ज घेतो व कर्जाची परतफेड न झाल्यास तो आत्महत्याला प्रवृत्त होतो, मात्र काही शेतकरी बँकांकडे येत नाहीत अशा परिस्थितीत गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या जाणून घेणार असल्याचे प्रतिपादन नारायणगव्हाण ता. पारनेर येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या नूतन शाखाधिकारी शैला गायकवाड यांनी केले.**



पुढे बोलताना गायकवाड म्हणाल्या की, नारायणगव्हाण ही शाखा ग्रामीण भागात आहे, या भागात दूध व्यवसाय व शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. आता आपण शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत जाणार व शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या जाणून घेणार व बँकेच्या सर्व आर्थिक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणार व त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देणार, पिककर्ज योजना प्रभावीपणे राबवणार, उद्योगधंद्यासाठी व महिला बचतगटांना आर्थिक सहाय्य करणार जेणेकरून महिलाही स्वावलंबी झाली पाहिजे मी ही ग्रामीण भागातील व शेतकरी कुटुंबातील मुलगी आहे मला सर्व समस्या ज्ञात आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्र नारायणगव्हाण शाखा अधिकारी म्हणून गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल खातेदारांच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना बँकेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी पत्रकार विशाल फटांगडे, उद्योजक अमोल यादव, बँक ऑफ महाराष्ट्रचे कॅशिअर मिलिंद वाढवणे, संकेत बेलसरे, सुरेश साळुंके, अविनाश औटी आदी यावेळी उपस्थित होते.

# शर्वरीच्या वाढदिवसाचा सकळांना आनंद !

## ■ मन:शांती छात्रालयातील बालकांना मिष्ठान्न भोजन ■ गायकवाड कुटूंबाचा अनोखा आदर्श

**अळकुटी : प्रतिनिधी**

**शिरूरच्या मनः शांती छात्रालयातील अनाथ बालकांच्या चेहऱ्यावर आनंदी आनंद दिसत होता. कारण होते. अळकुटी येथील उद्योजक, जोगेश्वरी उद्योग समुहाचे संचालक संतोष गायकवाड यांची कन्या शर्वरी हिच्या वाढदिवसाचे अनाथालयात जाऊन अन्नदान करीत गायकवाड कुटूंबाने शर्वरीच्या वाढदिवसाचा आनंद सकळांच्या चेहऱ्यावर अनुभवला !**



सोशल मीडियाच्या जमान्यामध्ये वाढदिवस साजरा करणे आलेच. अनेक जण अनाठायी खर्च करीत वाढदिवस साजरा करतात. अळकुटीच्या गायकवाड कुटूंबाने मात्र शर्वरीच्या वाढदिवसानिमित्त अनोखा आदर्श ठेवला. पद्मश्री सिंधूताई सपकाळ यांनी स्थान केलेल्या दि ग्लोबल फाउंडेशन संचलित शिरूर येथील मनः शांती छात्रालयातील अनाथ बालकांना गायकवाड कुटूंबाच्या वतीने दैनंदिन आवश्यक असलेला किराणा,तसेच खाऊ भेट देण्यात आला. शिवाय अनाथ बालकांना मिष्ठान्न भोजन देत त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदात गायकवाड कुटूंबाने शर्वरीच्या वाढदिवसाचा आनंद अनुभवला सामाजिक बांधिलकी जपणारा असा हा आदर्श इतरांसाठी निश्चित प्रेरणादायी ठरेल.

यावेळी संतोष गायकवाड, त्यांच्या पत्नी वर्षा गायकवाड, प्रा. विशाल रोकडे, गणेश परंडवाल, विजय वाळेकर, नम्या रोकडे, सचिन मोरे, नीलेश शिरोळे, सोन्याभाऊ साळवे, वैभव तितर यांच्यासह मदर ग्लोबल फाउंडेशनचे कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### वाढदिवसाचा आनंद इतरांपर्यंत पोहचला पाहिजे

**वाढदिवस साजरा करताना त्याचा आनंद सर्वसामान्य लोकापर्यंत कसा पोहचेल हे गायकवाड यांनी कृतीतून सिध्द केले. त्याचे अनुकरण करण्याची गरज आहे. संतोष गायकवाड व त्यांच्या बंधूंनी अळकुटी परिसरात सामाजिक कामांना चालना दिली आहे. वाढदिवस साजरा करताना त्यांनी सकळांच्या चेहऱ्यावर हसू पाहिले. त्यांचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी आहे.**

**प्रा. विशाल रोकडे**
**पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील कॉलेज, अळकुटी**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com